e Paper

आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 08/09/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 187 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# नागरिकांची गैरसोय करणारा विकास नको - खासदार श्रीरंग बारणे

## प्रशासनाने हट्ट न सोडल्यास नागरिक फूटपाथ उखडून टाकतील

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरणातील अंतर्गत रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी हरित सेतूच्या नावाखाली गरजेपेक्षा मोठे फुटपाथ बांधण्यात येत आहेत. यामुळे फूटपाथ मोठे झाले आहेत. मूळ रस्ते अत्यंत अरुंद झाले असून वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. हरित सेतूला स्थानिकांचा विरोध आहे. नागरिकांची गैरसोय करणारा विकास नको, स्थानिक नागरिकांच्या भावनांचा विचार करावा अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिली. प्रशासनाने हट्ट सोडला नाही आणि लोकांची गैरसोय थांबवली नाही, तर नागरिक स्वतः असे रस्ते आणि फुटपाथ उखडून टाकतील, असा इशाराही त्यांनी दिला.**



निगडी प्राधिकरणातील अंतर्गत रस्त्यांवर सुरु असलेल्या हरित सेतूच्या कामाला स्थानिक नागरिकांचा विरोध आहे. या पार्श्वभूमीवर खासदार बारणे या परिसराला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहरात 'स्मार्ट सिटी' उपक्रमांतर्गत आणि महापालिकेकडून सुरु असलेल्या रस्त्यांच्या आणि फुटपाथच्या कामांवरुन स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. प्रशासनाच्या हेकट कारभारामुळे आणि नियोजनशून्य विकासकामामांमुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. यासंदर्भात प्रशासनाने तातडीने योग्य ती कारवाई करावी आणि करदात्यांच्या पैशांची उधळण थांबवावी.

प्राधिकरणाने पूर्वी दिलेल्या भूखंडांवर बांधण्यात आलेल्या जुन्या पक्क्या घरांमध्ये स्वतःची पार्किंग व्यवस्था नाही. त्यामुळे रहिवाशांना गाड्या रस्त्यावरच पार्क कराव्या लागतात.

अशा परिस्थितीत फुटपाथ अर्ध्या रस्त्यापर्यंत वाढवल्याने नागरिकांची मोठी पंचाईत झाली आहे.

स्मार्ट सिटी आणि सुशोभीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. वाकडे-तिकडे डिझाईन्स करून रस्ते लहान केले जात आहेत. यापूर्वी सुशोभीकरणासाठी लावलेली किती झाडे जगली आणि किती पैसा वाया गेला, याचे ऑडिट केले पाहिजे.

प्रशासनाने स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता मनमानी कारभार सुरु ठेवला आहे.

यासंदर्भात पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच संबंधित विभागाचे प्रमुख बापू गायकवाड यांच्याकडे तक्रार नोंदवण्यात आली आहे.

लोकांना सोयीस्कर ठरेल असा योग्य आकाराचा फुटपाथ करण्यास आमचा विरोध नाही. मात्र, विकासाच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही. प्रशासनाने हट्ट सोडला नाही आणि लोकांची गैरसोय थांबवली नाही, तर नागरिक स्वतः असे रस्ते आणि फुटपाथ उखडून टाकतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

कोणताही विकास प्रकल्प राबवण्यापूर्वी स्थानिक नागरिकांशी चर्चा करून त्यांच्या गरजा समजून घेतल्या पाहिजेत. करदात्यांचा निधी अनावश्यक डिझाईन्स आणि दिखाऊ सुशोभीकरणावर उधळण्याऐवजी योग्य कामांसाठी वापरला गेला पाहिजे.

नागरिकांची गैरसोय होणार नाही, अशाच पद्धतीने रस्ते व फुटपाथचे नियोजन करावे. या प्रश्नाबाबत लवकरच महापालिका आयुक्तांना अधिकृत पत्र देऊन तीव्र विरोध दर्शवण्यात येणार असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# पुणे फेस्टिव्हल आयोजित लघुपट स्पर्धा “इतिहासाचा वारसा... पुण्याचा आरसा!”

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे ही केवळ विद्येची, संस्कृतीची आणि कलांची नगरी नाही, तर आपल्या समृद्ध इतिहासाचा आणि वैभवशाली सांस्कृतिक वारशाचा जिवंत आरसा आहे. या नगरीच्या इतिहासाशी जोडलेल्या असंख्य कथा, व्यक्तिमत्त्वे, वास्तू, घटना, परंपरा आणि सांस्कृतिक ठेवा आजही आपल्याशी संवाद साधत आहेत.**




याच समृद्ध वारशाला दृक्-श्राव्य माध्यमातून नव्या पिढीसमोर आणण्यासाठी पुणे फेस्टिव्हलतर्फे “इतिहासाचा वारसा... पुण्याचा आरसा!” या संकल्पनेवर आधारित लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेची संकल्पना व संयोजन ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर यांची असून याचे दिग्दर्शक सुनील नाईक आहेत. पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, जनरल सेक्रेटरी व सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई व विश्वस्त मोहन टिल्लू उपस्थित होते.

स्पर्धेची संकल्पना - या स्पर्धेसाठी विषय आयोजकांकडून दिले जातील. स्पर्धकांनी आयोजकांनी दिलेल्या विषयावर 5 ते 10 मिनिटांचा लघुपट तयार करावयाचा आहे. विषयाची मांडणी करताना इतिहास, संस्कृती, परंपरा, व्यक्तिमत्त्वे आणि घटनांकडे सर्जनशील आणि सिनेमॅटिक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी कलावंतांना मिळणार आहे. प्रभावी कथानक, दर्जेदार चित्रिकरण, सुंदर छायांकन, परिणामकारक Voice Over, पार्श्वसंगीत, नाट्यात्मक दृश्यरचना आणि कल्पक सिनेमॅटिक मांडणी यांचा आवश्यकतेनुसार वापर करता येईल.

कलावंतांसाठी विशेष संधी - ही स्पर्धा केवळ स्पर्धा नसून नवोदित आणि अनुभवी कलावंतांना आपली प्रतिभा जगासमोर मांडण्याचे व्यासपीठ आहे. लघुपट बनवणाऱ्या कलावंतांना जागतिक ओळख मिळवून देण्याची ही एक अनोखी संधी आहे.

पुण्याच्या इतिहासाची कथा तुमच्या कॅमेऱ्यातून उलगडू द्या. तुमची कल्पना, तुमची दृष्टी आणि तुमची कलाकृती पुण्याच्या इतिहासाला नवा सिनेमॅटिक आरसा देऊ शकते!

# 62 वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा 9 सप्टेंबरला

## पं. हृदयनाथ मंगेशकर, सलीम खान यांना जीवनगौरव, तर प्रसाद ओक, राणी मुखर्जी यांना विशेष योगदान पुरस्कारांचे होणार वितरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : महाराष्ट्राच्या समृद्ध चित्रपट परंपरेचा गौरव करणारा 62 वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा बुधवार, दि. 9 सप्टेंबर 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या आयोजनाने होणाऱ्या या सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासोबतच चित्रपती कै. व्ही. शांताराम तसेच स्व. राज कपूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारांचेही वितरण करण्यात येणार आहे.**




या सोहळ्यात चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, तर अभिनेते-दिग्दर्शक प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार, तर अभिनेत्री राणी मुखर्जी यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थितीत तर महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची विशेष उपस्थिती या सोहळ्यास लाभणार आहे.

महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीतील कलावंत, तंत्रज्ञ आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणाऱ्या या पुरस्कार सोहळ्याला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गेली 61 वर्षांहून अधिक काळ सातत्याने मराठी चित्रपटकर्मींच्या कलात्मक योगदानाचा गौरव करणारा हा पुरस्कार सोहळा एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. या पुरस्कार सोहळ्याची जय्यत तयारी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

“महाराष्ट्राच्या समृद्ध चित्रपट आणि सांस्कृतिक परंपरेला आकार देणाऱ्या दिग्गजांच्या योगदानाचे स्मरण करत, नव्या पिढीतील कलाकारांना प्रेरणा देण्याचे काम या पुरस्कारांच्या माध्यमातून सातत्याने केले जाते. पुरस्कार सोहळा भव्य आणि दिमाखदार पद्धतीने पार पडावा, यासाठी संबंधित यंत्रणांकडून आवश्यक तयारी करण्यात येत आहे.,” असे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी सांगितले.

# महाराष्ट्र-मध्यप्रदेशात घरफोड्या करणारा सराईत चोर जेरबंद; 24.30 लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शिरूर | प्रतिनिधी : युनूस खतीब

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात घरफोडीच्या तब्बल 14 गुन्ह्यांत सहभागी असलेल्या सराईत चोरट्याला पुणे ग्रामीण पोलिसांनी अमरावती जिल्ह्यातून अटक केली. आरोपीकडून सुमारे 16 तोळे सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा एकूण 24 लाख 30 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिपक भिमराव दांडगे (वय 25, रा. भैसदेही, जि. बैतूल, मध्यप्रदेश; सध्या रा. कविठा, ता. अचलपूर, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा आणि शिक्रापूर पोलिसांच्या पथकाने त्याचा माग काढला.चौकशीत आरोपीने शिक्रापूर पोलीस ठाण्यातील दोन आणि शिरूर पोलीस ठाण्यातील एका घरफोडीची कबुली दिली. या तीन गुन्ह्यांचा उलगडा झाला असून पुढील तपास शिक्रापूर पोलीस करीत आहेत. आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहे.

पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा व शिक्रापूर पोलिसांची संयुक्त कारवाई.




# शिक्षक दिनानिमित्त पिंपरी - चिंचवडमध्ये रंगले शिक्षक कविसंमेलन

## काव्यमयी वातावरणात शिक्षकांच्या प्रतिभेचा जागर!

**पिंपरी : महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी - चिंचवड शाखेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेले 'शिक्षक कविसंमेलन' अत्यंत उत्साहात आणि काव्यमयी वातावरणात संपन्न झाले.**




कवयित्री शान्ता शेळके सभागृह, संत तुकाराम संकुल, निगडी प्राधिकरण येथे संपन्न झालेल्या या संमेलनात विविध शाळा - महाविद्यालयांतील शिक्षक कवींनी आपल्या बहारदार रचना सादर करत साहित्यरसिकांची मने जिंकली.कार्यक्रमाला महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले, बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी - चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे, उपाध्यक्षा डॉ. रजनी शेठ, कार्यवाह डॉ. संजय जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. कविसंमेलनात कवी अशोक सोनवणे, प्रतिमा काळे, प्रा. महादेव रोकडे, जयश्री श्रीखंडे, अनुप्रिया प्रभू, ऐश्वर्या गर्जे, श्रावणी फुलझलके आदी कवींनी शिक्षणपद्धती, निसर्ग, सामाजिक वास्तव, मातृत्व आणि शिक्षक जीवनातील विविध अनुभवांवर आधारित कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. काही रचनांनी उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू उभे केले, तर काही हास्यकवितांनी सभागृहात खसखस पिकवली. रसिकांनी प्रत्येक कवितेला टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

याप्रसंगी डॉ. पांडुरंग भोसले यांनी समाजात आणि शिक्षण क्षेत्रात शिक्षकांच्या योगदानाचे विविध दाखले देत भारतीय संस्कृतीत शिक्षकांचे योगदान उत्युच्च असल्याचे प्रतिपादन केले; तर महेंद्र भारती यांनी आपल्या मनोगतातून ब्रिटिश काळापासून सुरु झालेली औपचारिक शिक्षणाची पद्धत आणि लोकमान्य टिळक, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, आगरकर, गोखले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहूमहाराज, भांडारकर, डॉ. राधाकृष्णन, कर्मवीर भाऊराव पाटील अशा भारतीय विचारवंतांनी आणि शिक्षण क्षेत्रातील धुरिणांनी समाजाला घडविण्यात दिलेले योगदान याविषयी सविस्तर ऊहापोह करून तळागाळातील माणूस शिक्षणाच्या माध्यमातून केंद्रस्थानी यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. राजन लाखे यांनी प्रास्ताविक केले. मसाप पिंपरी - चिंचवड शाखेच्या कार्यकारिणीने संयोजन केले. जालिंदर राऊत यांनी सूत्रसंचालन केले. संजय जगताप यांनी आभार मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 08/09/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# हिंजवडीच्या विकासाला मिळणार बूस्ट

## सात गावांचा महापालिका हद्दीत समावेशाचा मार्ग मोकळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**आयटी हबच्या झपाट्याने वाढणाऱ्या विस्ताराला मिळणार नियोजनबद्ध विकासाची जोड; रस्ते, पाणी, वाहतूक, स्वच्छता आणि नागरी सुविधांना गती मिळण्याची अपेक्षा**




पिंपरी-चिंचवड : हिंजवडी आणि परिसरातील सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समावेश करण्याच्या निर्णयामुळे या संपूर्ण परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य शासनाच्या निर्णयामुळे या गावांच्या महापालिका हद्दीत समावेशाचा मार्ग मोकळा झाला असून, गेल्या अनेक वर्षांपासून वेगाने विकसित होत असलेल्या हिंजवडी आयटी हबला आता नियोजनबद्ध नागरी विकासाची जोड मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हिंजवडी परिसराने गेल्या काही वर्षांत आयटी, उद्योग आणि रोजगाराच्या दृष्टीने मोठी झेप घेतली आहे. देश-विदेशातील नामांकित कंपन्यांचे कार्यालये, वाढती व्यावसायिक उलाढाल आणि रोजगाराच्या संधी यामुळे या परिसराची लोकसंख्या झपाट्याने वाढली. मात्र, विकासाचा वेग वाढत असताना त्याला आवश्यक असणाऱ्या नागरी सुविधांचा विस्तार त्या प्रमाणात झालेला नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी, अपुरे रस्ते, पाणीपुरवठ्याची समस्या, कचरा व्यवस्थापन, ड्रेनेज, अनधिकृत बांधकामे आणि सार्वजनिक वाहतूक यांसारखे प्रश्न गंभीर बनले आहेत.

महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतर या प्रश्नांकडे अधिक व्यापक आणि एकात्मिक पद्धतीने पाहता येणार आहे. विशेषतः रस्ते विकास, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, पथदिवे, उद्याने, आरोग्य सुविधा तसेच इतर मूलभूत नागरी सुविधांचे नियोजन महापालिकेच्या माध्यमातून करता येणार आहे.

### वाहतूक कोंडीवर उपाययोजनांची अपेक्षा

हिंजवडीची सर्वात मोठी समस्या म्हणजे वाहतूक कोंडी. आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांची दररोजची ये-जा, वाढती वाहनसंख्या आणि त्यामानाने अपुरी रस्ते व्यवस्था यामुळे सकाळी आणि सायंकाळी या परिसरात वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण होते.

महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतर रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन रस्त्यांची निर्मिती, अंतर्गत रस्त्यांचे जाळे मजबूत करणे, वाहतूक नियोजन तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या विस्तारासाठी अधिक समन्वयाने काम करता येण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिंजवडीकडे ये-जा करणाऱ्या नागरिकांना आणि आयटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो.

### पाणी आणि स्वच्छतेचा प्रश्नही सुटण्याची शक्यता

हिंजवडी परिसराचा झपाट्याने झालेला विस्तार पाहता पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या सुविधांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. नव्या समावेशामुळे पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन, जलवाहिन्यांचा विस्तार, सांडपाणी व्यवस्थापन आणि कचरा संकलनासाठी महापालिकेला स्वतंत्र आराखडा तयार करता येणार आहे.

याशिवाय परिसरातील अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे, बांधकामांना नियोजनबद्ध परवानग्या देणे आणि भविष्यातील वाढ लक्षात घेऊन नागरी आराखडा तयार करणे, हीदेखील महापालिकेसमोरील महत्त्वाची कामे असणार आहेत.

### आयटी हबला मिळणार नागरी सुविधांची साथ

हिंजवडी हा केवळ पिंपरी-चिंचवडच नव्हे तर महाराष्ट्राच्या आर्थिक आणि आयटी विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदू बनला आहे. मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणाऱ्या या परिसराला जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा देणे आवश्यक आहे.

महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतर रस्ते, वाहतूक, पाणी, स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य, अग्निशमन, उद्याने आणि इतर नागरी सुविधांच्या माध्यमातून हिंजवडीचा विकास अधिक शिस्तबद्ध पद्धतीने करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या निर्णयाकडे केवळ हद्दवाढ म्हणून न पाहता, पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील आर्थिक आणि नागरी विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले जात आहे.

### महापालिकेसमोर मोठे आव्हान

सात गावांचा समावेश झाल्यानंतर महापालिकेच्या क्षेत्रफळासोबतच जबाबदारीही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. नव्याने समाविष्ट होणाऱ्या भागात मूलभूत सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी, मनुष्यबळ आणि दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता असणार आहे.

हिंजवडीचा वाढता विस्तार लक्षात घेता केवळ विद्यमान समस्या सोडवणे पुरेसे ठरणार नाही, तर पुढील 20 ते 30 वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. वाढती लोकसंख्या, वाहनसंख्या, व्यावसायिक विकास आणि भविष्यातील औद्योगिक विस्तार यांचा विचार करून महापालिकेला विकासाचा मास्टर प्लॅन तयार करावा लागणार आहे.

एकूणच, सात गावांचा महापालिका हद्दीत समावेश हा हिंजवडी परिसरासाठी विकासाची नवी दिशा ठरू शकतो. मात्र, या निर्णयाचे खरे यश महापालिकेकडून होणाऱ्या नियोजनबद्ध अंमलबजावणीवर अवलंबून असणार आहे. हिंजवडीला जागतिक दर्जाच्या आयटी हबसोबत जागतिक दर्जाच्या नागरी सुविधा मिळाल्या, तर पिंपरी-चिंचवडच्या विकासाला निश्चितच नवी उंची मिळू शकते.

**ठळक मुद्दे**

- हिंजवडीसह सात गावांचा महापालिका हद्दीत समावेश
- हिंजवडी आयटी हबच्या विकासाला मिळणार नवी दिशा
- रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा
- पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थेला मिळणार गती
- कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची संधी
- अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्याची शक्यता
- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करण्याचे आव्हान
- वाढत्या लोकसंख्येसाठी दीर्घकालीन नियोजनाची गरज
- नव्या गावांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे महापालिकेसमोरचे मोठे आव्हान
- हिंजवडीच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडच्या आर्थिक विकासाला मिळू शकते नवी चालना

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968